# डेंग्यू–चिकनगुनिया नियंत्रणासाठी राज्यस्तरीय टीमची पाहणी

**अकोला :** आज दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजी सहसंचालक आरोग्य सेवा पुणे येथून आलेल्या राज्यस्तरीय टीमने अकोला जिल्ह्याला भेट देऊन किटकजन्य आजारांवरील उपाययोजनांचा आढावा घेतला. सद्यस्थितीत अकोला जिल्ह्यात डेंग्यू आणि चिकनगुनियाच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याने ही भेट घेण्यात आली. या टीममध्ये डॉ. महेंद्र जगताप (राज्य किटकशास्त्रज्ञ), डॉ. प्रेमचंद कांबळे (सहाय्यक संचालक, ह.) आणि डॉ. सुळे (वैद्यकीय अधिकारी, साथरोग कक्ष) यांचा समावेश होता. त्यांनी जिल्हा हिवताप कार्यालयात आढावा बैठक घेऊन कीटकजन्य आजार नियंत्रणासाठी आवश्यक सूचना दिल्या.



# शेतकऱ्यांना आधुनिकतेकडे नेणाऱ्या शिवार फेरीची राष्ट्रीय स्तरावर दखल : डॉ सुब्रतो रॉय

## शिवार फेरीच्या दुसऱ्या दिवशीही विद्यापीठाचे शिवार शेतकऱ्यांच्या गर्दीने फुलले





**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** जागतिक हवामान बदलाच्या या कालखंडात शेती व्यवसाय शाश्वत करण्यासाठी आता शास्त्रोक्त पद्धतीचा वापर गरजेचा असून डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ द्वारे गत अनेक वर्षांपासून राबविण्यात येत असलेल्या शिवार फेरीची राष्ट्रीय स्तरावरील संस्थांनी देखील दखल घेतली असून महाराष्ट्र राज्यासह इतर शेजारी राज्यांनी देखील खरीप हंगामातील विविध पीक पद्धतींचे जिवंत प्रदर्शन करणाऱ्या शिवार फेरीचे आयोजन करणे शेतकरी हिताचेच ठरेल असे प्रशंसनीय प्रतिपादन भारतीय कृषि अनुसंधान परिषद नवी दिल्ली अंतर्गत कृषि प्रद्योगिकी अनुप्रयोग अनुसंधान संस्थान, आटारी पुणेचे संचालक डॉ. सुब्रतो रॉय यांनी केले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला व कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांचे साहित्य विद्यमाने आयोजित तीन दिवसीय खरीप शिवार फेरीचे आज दुसरे दिवशी आयोजित चर्चासत्राचे प्रसंगी उपस्थित शेतकरी बंधू भगिनींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. वैदर्भीय शेतकरी मेहनती, कष्टाळू असून त्याला कृषी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानरूपी मार्गदर्शनाची समर्थ साथ लाभत असल्याने वैदर्भीय शेती शाश्वत आणि शेतकरी समृद्ध होण्यासाठी पूरक वातावरण निर्मिती झाल्याचे देखील डॉ. रॉय यांनी पुढे बोलताना सांगितले व शिवार फेरीसारखा अतिशय महत्त्वकांक्षी उपक्रम राबविल्याबद्दल कुलगुरू डॉ. शरद गडाख व संपूर्ण डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ प्रशासनाचे तथा राज्य शासनाच्या कृषी विभागाचे अभिनंदन केले.

# अनुकंपा भरतीतील २३ उमेदवारांची तात्पुरती निवड यादी प्रसिद्ध

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील १५० दिवसांच्या कृती कार्यक्रमांतर्गत अकोला जिल्हा परिषदेतील अनुकंपा भरतीचा प्रलंबित विषय मार्गी लावण्यात आला आहे. अनुकंपा प्रतीक्षा निवड यादीतून २३ उमदेवारांची तात्पुरती निवड यादी अकोला जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये गट क चे ११ व गट ड चे १२ उमेदवारांचा समावेश आहे.जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाने दि. १७ जुलैच्या शासन निर्णयाप्रमाणे ही तात्पुरती निवड यादी तयार केली आहे.याकरिता जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ प्रशासन अधिकारी भारती देशमुख, वरिष्ठ सहाय्यक श्री. कुलाल यांनी परिश्रम घेतले. अनुकंपा भरतीतील प्रतिक्षा यादीत असणाऱ्या २३ उमेदवारांना ही तात्पुरती निवड यादी प्रसिद्ध झाल्यामुळे दिलासा मिळाला आहे.

# नागरिकांच्या मागणीनुसार पाणी पट्टी कर भरणेसाठी

## पश्चिम झोन येथे ३ दिवसीय शिबीराचे आयोजन

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना आपले पाणी पट्टी कर भरणे तसेच बिला संदर्भातील काही तक्रार असल्यास त्याचे निराकरण करणे अधिक सोईचे व्हावे याकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये मना क्षेत्रातील विविध भागात शिबीराचे आयोजन करण्याचे क्रम प्राप्त होते त्या अनुषंगाने मनपा जलप्रदाय विभागाव्दारे शहरातील विविध भागात कॅम्पचे आयोजन करण्यात येत आहे.या अनुषंगाने नागरिकांच्या मागणीनुसार पश्चिम झोन येथील पश्चिम झोन कार्यालय, डाबकी रोड पोलीस स्टेशनच्या बाजूला, डाबकी रोड येथे दि. २३ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत तीन दिवसीय शिबीराचे (कॅम्प) आयोजन करण्यात आले आहे. या कॅम्प मध्ये संबंधीत भागातील नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपला थकित व चालू वर्षातील पाणी पट्टी कराचा भरणा करून तसेच पाणी पट्टी देयका मध्ये तृटी असल्यास ते दुरूस्त करून पाणी पट्टी कराचा भरणा करून अकोला महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मनपा जलप्रदाय विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे. कृपया शिबीरात येता वेळी पाणी पट्टी देयकाची प्रत, मिटर रिडींगचा फोटो आणि पुर्वी देयक अदायगी संदर्भातील पावती सोबत आणावी.

# तालुक्यात डायलिसिस सेंटरची गरज तीव्र

## नागरिकांनी रुग्णांची माहिती जमा करण्याचे आवाहन

**▪तेल्हारा,दि २१ (प्रतिनिधी) :** तालुक्यातील वाढत्या किडनीग्रस्त रुग्णसंख्येमुळे डायलिसिस सेंटरची गरज तीव्र झाली आहे. सध्या रुग्णांना डायलिसिससाठी दूरवर प्रवास करावा लागतो, ज्यामुळे त्यांचा वेळ, पैसा व शारीरिक त्रास वाढत आहे. यापार्श्वभूमीवर तेल्हारा तालुक्यात डायलिसिस सेंटर सुरू करण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रयत्नांना गती देण्यात आली आहे. यासाठी सर्व नागरिकांनी आपल्या गावातील किडनीग्रस्त रुग्णांची यादी तयार करून ती विशाल नांदोकार (माऊली नेट कॅफे तेल्हारा) यांच्याकडे जमा करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ही माहिती शासन व संबंधित आरोग्य विभागाकडे सादर करून तालुक्याला डायलिसिस सेंटर मिळिवण्यासाठी प्रयत्न अधिक प्रभावी होतील. या उपक्रमामुळे तालुक्यातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, डायलिसिससाठी लागणारा खर्च व प्रवासाचा त्रास दोन्ही कमी होण्यास मदत होईल. सामाजिक बांधिलकी म्हणून प्रत्येक गावातील नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा. अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# पूजा नवरात्र उत्सवाची जोरदार तयारी

**अकोला:**रविवारी सर्वपित्री अमावस्येला पितरांना पान घालण्यात आले. पितरांचे आशीर्वाद कुटुंबाला मिळावे म्हणून पूजा आणि नैवेद्य दाखविण्यात आला. ७ सप्टेंबर पासून पितृ पंधरवड्याला सुरूवात झाली. आणि रविवार, २१ रोजी सांगता झाली. सोमवार पासून नवरात्र महोत्सव सुरू होत आहे.नवरात्र उत्सवासाठी शहरातील मंदिरे सुशोभित करण्यात आली आहे. रोषणाई करण्यात आली आहे.

# अकोला पोलीसांचे नाकाबंदी व कोम्बींग ऑपरेशन

## जिल्हयात ५ हत्यार जप्त, कलम १२२ प्रमाणे १३ व १ तडीपार इसमावर कारवाई



**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** जिल्हयात मालमत्तेच्या गुन्हयांना आळा बसावा याकरीता दि. १९.०९.२०२५ चे रात्री २२.०० वा ते दि. २०.०९.२०२५ चे ०५.०० वा पावेतो मा. पोलीस अधीक्षक, श्री अर्चित चांडक यांचे आदेशान्वये अकोला जिल्हयात अमावस्या नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणे प्रभारी अधिकारी व दुय्यम अधिकारी असे एकुण ३९ अधिकारी व २०८ अंमलदार यांनी सहभाग घेवुन नाकाबंदी दरम्यान खालील प्रमाणे प्रभावी कारबाई करण्यात आली.नाकाबंदी दरम्यान बॅरेकेटींग करून जिल्हयात ६८२ वाहने चेक करून मोटार वाहन कायदयान्वये १२१ कारवाई करून ४८१००/- रू चा दंड आकरण्यात आला आहे. तसेच १३५ समन्स, ४७ जमानती वॉरंट, २० पकड वॉरंट तामील करण्यात आले.५८ अभिलेखावरील निगराणी बदमाश व माहितीगार गुन्हेगार यांना चेक करण्यात आले.

व कलम १२२ मपोका प्रमाणे १३ कारवाई, भारतीय हत्यार कायदयान्वये ०५ केसेस करून ०५ घातक शस्त्रे जप्त करण्यात आले.

## थोडक्यात

### मुंगीलाल विद्यालयाच्या प्रांगणात आजपासून गरबा महोत्सवास सुरुवात

**अकोला :** अखिल भारतीय गुजराती समाज अकोला व श्री गुजराती नवरात्र समितीच्या वतीने २२ सप्टेंबरपासून १ ऑक्टोबरपर्यंत मुंगीलाल बाजोरिया विद्यालयाच्या प्रांगणात भव्य गरबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव गेली दोन दशके सातत्याने साजरा केला जात असून, यावर्षीही नागरिकांना पारंपरिक आणि शालीन गरबा अनुभवता येणार आहे. या महोत्सवात अरुण मोदी आणि श्वेता मोदी यांच्या ए.आर. संगीत टीमच्या सादरीकरणात गरबा होणार असून, बेंजो व ढोलकीसारख्या पारंपरिक वाद्यांच्या सुरात गरबा रंगेल. महोत्सवामध्ये रोज घट स्थापना, चंडीपाठ, आरती आणि पूजन होईल. अष्टमी दिनी होम–हवन करण्यात येणार आहे. प्रवेश पासेसद्वारे दिला जाणार असून, मुख्य प्रवेशद्वार मेन हॉस्पिटलसमोरील बाजोरिया विद्यालयाकडून असेल. प्रांगणात दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी पार्किंगची सुविधा आहे. तसेच सीसीटीव्ही, महिला गार्ड, पुरुषांसाठी स्वतंत्र बसण्याची आणि गरबा खेळण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. महिलांनी पारंपरिक पोशाख परिधान करून गरबा खेळावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रांगणात फूड झोन आणि विविध प्रकारचे स्टॉल्स असतील. उत्तम विद्युत व ध्वनी व्यवस्था हे या महोत्सवाचे आकर्षण ठरणार आहे. महोत्सवात चांगला गरबा सादर करणाऱ्या महिला व मुलींना आकर्षक पुरस्कार दिले जातील. या महोत्सवाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम रविवार, २१ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ७ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या महोत्सवाच्या आयोजनाची माहिती रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत समितीचे हरीश लाखानी यांनी दिली.

# अकोला वैद्यकीय महाविद्यालयात तात्काळ एमआरआय मशीन उपलब्ध करून द्यावे

## आ. साजिद खान पठाण यांची ना. मुश्रीफ यांना मागणी

**विधिमंडळ अधिवेशनातही उचलला दोन वेळा प्रश्न**

**पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण निवडून आल्यापासूनच वैद्यकीय सेवेवर सभागृहात प्रश्न उपस्थित करीत आहे. राज्याच्या विधिमंडळ अधिवेशनातही सुपरस्पेशालिटी मधील विविध समस्या, बंद पडलेली उपकरणे, आणि एमआरआय मशीनचा प्रश्न आ. पठाण यांनी दोनवेळा उपस्थित केला होता.**

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** अकोला वैद्यकीय महाविद्यालय व सुपर स्पेशालिटी रुग्णालयात एमआरआय मशीनची गंभीर समस्या निर्माण झाली असून रुग्णांना तपासणीसाठी थेट तीन–तीन महिने प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे अनेक रुग्णांचे उपचार लांबणीवर जात असून जीव धोक्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजीद खान पठाण यांनी राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे तातडीने नवीन एमआरआय मशीन उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

केंद्र शासनाच्या कोट्यवधी रुपयांतून उभारण्यात आलेले अकोला सुपर स्पेशालिटी रुग्णालय अत्याधुनिक सुविधांसाठी प्रसिद्ध असले तरी एमआरआयसारख्या महत्वाच्या तपासणीसाठी फक्त एकच यंत्र उपलब्ध आहे. त्यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.उन्हाळी व पावसाळी अधिवेशनात या संदर्भात झालेल्या चर्चेदरम्यान मंत्र्यांनी अकोला वैद्यकीय महाविद्यालयात नवीन एमआरआय मशीन उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्यापही त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याने रुग्णांचे हाल होत आहेत. ही समस्या दूर करण्यासाठी तात्काळ पावले उचलून नवीन एमआरआय मशीनची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.सदर निवेदनाच्या प्रतिलिपी जिल्हाधिकारी, अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय तसेच जिल्हा शल्य चिकित्सक सार्वजनिक रुग्णालय यांनाही पाठविण्यात आली आहे.

# नवरात्रोत्सव – २०२५ मनपा एक खिडकीतून आजपर्यंत एकुण २१३ मंडळांना परवानगी

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** अकोला शहरात नवरात्री उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येत असतो व शहरातील सार्वजनकि ठिकाणी नवदुर्गा उत्सव मंडळांव्दारे मंडप उभारून देखावे तसेच गर्भा रासचे आयोजन करण्यात येत असतात. त्यासाठी त्यांना नियमानुसार मंडप परवानगी, विद्यूत जोडणी लाऊड स्पीकर, शहर वाहतूक व ईतर परवानगी घ्यावी लागते. नवरात्री उत्सव मंडळांना अधिक सोईचे व्हावे याकरिता मनपा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि महावितरण (धर्मदाय आयुक्त वगळून) सर्व परवानग्या एकाच ठिकाणी देण्याकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे एक खिडकी योजना प्रणाली दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी पासून कार्यालयीन वेळेत कार्यान्वीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने आज शेवटच्या दिवशी पर्यंत एकुण २१३ नवरात्री उत्सव मंडळांना परवानगी देण्यात आली आहे. तसेच मागीच्या वर्षी नवरात्रोत्सव – २०२४ अंतर्गत शहरातील एकुण १६९ नवरात्री उत्सव मंडळांनी परवानगी घेतली होती.

# किसान संघाच्या राष्ट्रीय सचिव पदी प्रकाश पोहरे



**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** भारतीय किसान संघ परिसंघ या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेच्या सचिव पदी शेतकरी नेते व किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश पोहरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे,

भारतीय किसान परिसंघाचे पी चंगल रेड्डी यांच्या सहीने हे नियुक्तीपत्र देण्यात आले आहे अशी माहिती किसान ब्रिगेडचे प्रवक्ते धनंजय मिश्रा यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे देशभरातील शेतकऱ्याची व शेतीची वर्तमान परिस्थिती आयात निर्यात धोरण आणि सरकारी धोरण ठरविण्यासाठी ही समिती सरकारला प्रस्ताव सादर करीत असते राजधानी दिल्लीमध्ये या समितीचे कार्यालय असून मानत अध्यक्ष म्हणून शेतकरी संघटनेचे रघुनाथ दादा पाटील हे याचे काम पाहतात अशी माहिती सुद्धा धनंजय मिश्रा यांनी दिली आहे किसान ब्रिगेड च्या माध्यमातून प्रकाश पोहरे यांनी देशभरातील शेतकऱ्यांना एकत्रितपणे जोडण्याची मोहीम हाती घेतली असून या निमित्याने त्यांच्या कार्याचा प्रभाव दिसून येत आहे,

यावेळी तत्कालीन अर्थमंत्री पी चिदंबरम शेतीमंत्री शरद पवार व देशाचे माजी कॅबिनेट मंत्री मोहन धारिया बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रकाश पोहरे यांच्या या कार्यामुळे देशभरातील शेतकऱ्यांच्या संघटनेमध्ये त्यांनी आपल्या कार्याची चुणूक या आधीच दाखवून दिलेली आहे भारतीय किसान परिसंघ ( शिफा) च्या ऑर्गनायझिंग कमिटीवर राष्ट्रीय सचिव पदाची जबाबदारी घेऊन शेतकरी नेते प्रकाश पोहरे एक चांगली भूमिका पार पाडतील असा आम्हाला विश्वास असल्याचे मत धनंजय मिश्रा यांनी पत्रका च्या शेवटी व्यक्त केले आहे.

# कांदा साठवणुकीसाठी अणु तंत्रज्ञानाचा वापर

## खा.धोत्रे ची मुंबईतील महत्त्वपूर्ण भेट

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** भारतातील कांदा उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा सुमारे ४३% आहे. विदर्भातील बहुसंख्य शेतकरी आजही पारंपरिक चाळींमध्ये कांदा साठवतात. दर्जेदार साठवणुकीच्या सुविधांचा अभाव, पावसाचे व आर्द्रतेचे संकट यामुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागते.

या पार्श्वभूमीवर खासदार अनुप धोत्रे यांनी मुंबई दौऱ्यात भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटर (इअठउ), ट्रॉम्बे, मुंबई येथील शास्त्रज्ञांसोबत बैठक घेतली. तसेच इअठउ व राष्ट्रराज्य पणन मंडळ, वाशी यांच्या संयुक्त विकिरण सुविधा प्रकल्पाला भेट देऊन कांदा साठवणुकीतील अणु तंत्रज्ञानाविषयी सविस्तर माहिती घेतली.कांद्याच्या विकिरणासाठी नियंत्रित प्रमाणात आयोनायझिंग रेडिएशन चा वापर केला जातो. या प्रक्रियेमुळे कांदा गरम होत नाही किंवा किरणोत्सर्गी बनत नाही. उलट या तंत्रज्ञानामुळे कांद्याची कुजण्याची नैसर्गिक प्रक्रिया मंदावते, शेल्फ लाइफ वाढते व साठवणुकीदरम्यान होणारे नुकसान मोठ्या प्रमाणावर कमी होते.या तंत्रज्ञानाचा उद्देश शेतकऱ्यांना कांदा साठवणुकीसाठी आधुनिक व सुरक्षित पर्याय उपलब्ध करून देणे, तसेच उत्पादनाला चांगला भाव मिळवून देणे हा आहे.खासदार अनुप धोत्रे म्हणाले की,ङ्गअणु तंत्रज्ञानावर आधारित कांदा बँक ही संकल्पना शेतकऱ्यांसाठी गेम चेंजर ठरेल.



उत्पादनाची नासाडी कमी होईल आणि शेतकऱ्यांना थेट फायदा मिळेल. डॉ. रणजितजी सपकाळ (अध्यक्ष, दि. निळकंठ सूतगिरणी, अकोला व संचालक, महाबीज, अकोला),श्री. उन्मेष मालू ,(माजी अध्यक्ष,अकोला इंडस्ट्री असोसिएशन) स्वीय सहायक श्री. ऋषिकेश देवर हे उपस्थित होते.

### सहकारी सेवा सोसायटी चे अध्यक्ष

# मनोहरलालजी फाफट यांच्या प्रयत्नांना अखेर यश



**▪अडगांव बु.,दि २१ (प्रतिनिधी) :** तेल्हारा तालुक्यातील अडगांव बु येथिल सहकारी सेवा सोसायटीच्या २४८ शेतकऱ्यांची रडखडलेली छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी गेल्या आठ वर्षापासून मिळाली नाही याबद्दल सोसायटी अध्यक्ष माननीय मनोहरलालजी फाफट यांनी अनेक वेळा शासनास निवेदन दिले ,पण याचा शासनावर काही फरक पडला नाही शेवटी उच्च न्यायालय मध्ये सर्व शेतकऱ्यांच्या वतीने केस दाखल केली, व निकाल सोसायटीच्या बाजूने लागला महाराष्ट्रात एकमेव सोसायटी जी शासनाविरुद्ध शेतकऱ्यांच्या वतीने लढून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला ह्याबद्दल सर्व शेतकऱ्यांच्या वतीने गावकऱ्यांच्या वतीने अध्यक्षांचे मनःपूर्वक अभिनंदन होतं आहे.

## पोलीस प्रशासनाने नागरी सुरक्षे सोबतच पर्यावरण रक्षणाचा ही बिडा उचलला: कॅप्टन सुनिल डोबाळे

**अकोला** : पोलीस प्रशासना तर्फे अकोट उपविभागीय पोलीस अधिकारी (SDPO) श्री निखील पाटील पोलीस निरिक्षक (ग्रामिण ) श्री किशोर जुनगरे उप पोलीस निरिक्षक सौ काटोले व पोलीस दलातील अनेक सिपाही यांनी आपल्या या पर्यावरण रक्षणाच्या मोहीमेत तालून्यातील ताजनापुर वडगांव ग्राम पंचायत क्षेत्रात वृक्षारोपन केले.या प्रसंगी वृक्षारोपना नंतर झालेल्या छोटे खाणी स्वागत समारंभात कॅप्टन डोबाळे यांनी SDP0 निखिल पाटील यांना पुष्प गुच्छ व श्री विलास मेंढे यांच्या हस्ते श्री जुनगरे साहेब यांना पुच्छ गुच्छ देवून त्यांचे स्वागत करण्यात आले . या मोहीमे अंतर्गत पोलीस प्रशासनाने एक आर्मि ऑफिसर कॅप्टन सुनिल डोबाळे यांच्याच गावाची सर्वप्रथम निवड केल्या बद्दल कॅप्टन डोबाळे यांनी श्री किशोर जुनगरे साहेब व श्री निखिल पाटील साहेब यांचे आभार मानलेत . तसेच फक्त अगदी एक दिवसाच्या पुर्व सुचने वरून रविवारी सुटीच्या दिवशी सकाळी ८ वाजता गावचे सरपंच श्री विलास मेंढे उपसरपंच श्री विजुभाऊ भेले ग्रामपंचायत चे सचिव श्री रविंद तायडे सह सर्व गावकरी मंडळीनी तयारी पूर्ण केल्या बद्दल एस डी पी ओ साहेबांनी सरपंचाचे व गावकऱ्यांचे तोंड भरून कौतुक केले. कॅप्टन सुनिल डोबाळे यांनी हे माझे गांव व अनुशासन प्रिय गाव असून आपण पोलीस प्रशासनाने लावलेल्या वृक्षांचे संवर्धन ही करेल आणि याचा फॉलो अप घेवून दरवर्षी फिडबॅक ही पाठविल्या जाईल याची ग्वाही दिली.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व गावकऱ्यांनी पोलीस प्रशासनाला उत्कृष्ठ कार्यक्रम पार पाडण्या करीता केलेल्या सहकार्या बद्दल सर्वांचे आभार मानले

# उमा बॅरेज घोटाळा १७ वर्षांचा प्रचंड भ्रष्टाचार जनतेसमोर!

### जनतेचा जळजळीत सवाल-धरणाचे काम थांबवून आमचे आयुष्य उद्धवस्त, आणि भ्रष्टाचार मात्र कोट्यावधींचा?

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी):** मुर्तीजापूर तालुक्यातील रोहणा गावचे शेतकरी व नागरिकांनी आज (२१ सप्टेंबर) पुन्हा एकदा संतप्त आक्रोशाने प्रशासन व लोकप्रतिनिधींना जाब विचारला. उमा बॅरेज प्रकल्पाच्या नावाखाली गेल्या १४ वर्षांत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याच्या बातम्या नुकत्याच सर्वत्र प्रसिद्ध झाल्या. आणि तरीसुद्धा, पाटबंधारे विभाग नागपूरच्या मुख्य कार्यालयातून फक्त ३२ हजार रुपये वसूल करू असा दिखावूपणा केला जातो. जनतेचा संतप्त सवाल आहे की - जेव्हा वर्षानुवर्षे भ्रष्टाचार चालू होता, तेव्हा आम दार व लोकप्रतिनिधी आंधळे-बहिरे झाले होते का?या प्रकल्पाचे भूमिपूजन आणि उद्घाटन आमदारांच्या कार्यकाळात झाले. प्रकल्प त्यांनी आणला, नाव घेताना गर्वाने छाती ठोकली. मग १७ वर्षांत धरणाचे काम का थांबले? आज विकास कुठे गेला? मतदारसंघाचे भविष्यच काळोखात लोटले गेले.काटेपुर्णा व घुंगशी प्रकल्प पूर्ण, पुनर्वसन झाले; पण उमा बॅरेज मात्र भ्रष्टाचाराच्या दलदलीत गाडले गेले. हा प्रकल्प थांबण्यामागे राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, लोकप्रतिनिधींची उदासीनता व भ्रष्टाचार याशिवाय दुसरे कोणते कारण असू शकते? असा संतप्त प्रश्न जनतेसमोर दणाणून उठतो आहे. गावकऱ्यांनी अंतिम इशारा दिला आहे की २८ सप्टेंबरपासून आम्ही नदीपात्रात आमरण उपोषणाला बसणार. आणि जर या प्रकरणात मृत्यू किंवा हानी झाली तर त्याला थेट लोकप्रतिनिधी आणि भ्रष्टाचारात गुतलेले प्रशासनच जबाबदार राहील.



**आम्ही आमची सुपीक जमीन दिली, मोबदला मिळाला नाही. धरणाचे काम सुरू झाले नाही. मात्र भ्रष्टाचाराच्या बातम्या दरवर्षी आल्या. आता जनतेच्या डोळ्यां समोर महाभयंकर घोटाळा उघड झाला आहे. आम्हाला न्याय न मिळाल्यास २८ सप्टेंबरपासून नदीपात्रात आमरण उपोषण करून आमची शेवटची लढाई लढू!**
**– जेष्ठ शेतकरी शंकरराव पाटील**

# ग्रामपंचायत सदस्या अफसानाबी अपात्र

### अपर आयुक्तांकडून अपील नामंजूर
### जिल्हाधिकारी यांचा आदेश कायम

**▪अडगांव बु.दि २१ (प्रतिनिधी) :** तेल्हारा तालुक्यातील अडगांव बु येथे शासकीय जागेवर अतिक्रमण केल्या प्रकरणी दोषी आढळून आलेल्या अडगाव बु ग्रा प सदस्या अफसानाबी शेख राजिक कुरेशी यांना विद्यमान जिल्हाधिकारी यांनी ०२/०२/२४ ला दिलेल्या आदेशान्वये सदस्य पदावरून अपात्र घोषित केले होते त्या आदेशाविरुद्ध कुरेशी यांनी विद्यमान अपर आयुक्त अमरावती यांचेकडे दाखल केलेले अपील विद्यम ान अपर आयुक्त यांनी नामंजूर करीत विद्यमान जिल्हाधिकारी यांचा आदेश कायम ठेवल्याने ग्रा प सदस्या अफसानाबी अपात्र घोषित करण्यात आल्या आहेत.

स्थानिक घाणा चौकातील नझूल शिट नंबर ३ प्लॉट नंबर २६६ च्या आजुबाजुला असलेल्या शासकीय जागेवर ग्रा प सदस्या अफसानाबी यांचे पती व कुटुंबियांनी पदाचा दुरुपयोग करून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याची तक्रार माजी उपसरपंच महेबुबखॉं पठाण व शेख बरकत मेकॅनिक यांनी विद्यमान जिल्हाधिकारी यांचेकडे केली होती त्यावर जिल्हाधिकारी अकोला यांनी दोषी ठरवत दिनांक ०२/०२/२४ ला दिलेल्या आदेशान्वये ग्रा प सदस्या अफसानाबी यांना सदस्य पदावरून अपात्र घोषित केले होते त्या आदेशाविरुद्ध कुरेशी यांनी विद्यमान अपर आयुक्त अमरावती यांचेकडे अपील दाखल केले होते याप्रकरणी महेबुबखॉं पठाण व शेख बरकत मेकॅनिक यांचे वतीने ॲड पी आर देशमुख,ॲड व्ही एस मायकर, ॲड प्राची कराळे अमरावती यांनी युक्तिवाद करुन आपली बाजू मांडली त्यावर विद्यमान अपर आयुक्त अम रावती यांनी प्रकरण क्र १३/महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १६ (२) अडगाव बु/ तेल्हारा/अकोला २०२४ अन्वये अपिलार्थी यांची अपील अर्ज नामंजूर करुन विद्यमान जिल्हाधिकारी अकोला यांचा आदेश कायम ठेवत ग्रा प सदस्या अफसानाबी यांना सदस्य पदावरून अपात्र घोषित केले आहे.

## आज महानगरात भव्य अग्रसेन जयंती
## राणी सती धाम मधून निघणार भव्य शोभायात्रा

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी):** सकल अग्रवाल समाजाचे आराध्य महाराजा अग्रसेन यांची जयंती आज सोमवार दिनांक २२ सप्टेंबर रोजी महानगरात साजरी होत आहे.अग्रवाल समितीच्या वतीने आज साय ७ वाजता स्थानीय अग्रसेन भवनात आयोजित या जयंती सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय आयुक्त श्वेता सिंघल व विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुनीत अग्रवाल उपस्थित राहणार आहेत.या सोहळ्यात दिवंगत जेष्ठ समाजसेवी स्व कांतादेवी राजकुमार गोयनका यांना अग्रविभूती सन्मान दिल्या जाणार आहे.या जयंती दिनी दुपारी ४



वाजता स्थानीय राणी सती धाम येथून महाराजा अग्रसेन यांची भव्य शोभायात्रा समाजाच्या महिला पुरुष व आकर्षक झाक्या समवेत निघणार आहे.ही शोभायात्रा राणी सती धाम येथून प्रारंभ होऊन गांधी रोड,सिटी कोतवाली, टिळक रोड,जुने कापड बाजार,गांधी चौक, तहसील मार्गे अग्रसेन भवनात येऊन या ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य जयंती सोहळा होणार आहे. या जयंती व शोभायात्रा मध्ये अग्रवाल सम ाजाच्या सर्व महिला पुरुष व युवक युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन अग्रवाल समितीचे अध्यक्ष दीपक गोयनका, सचिव विनोद टोरका,अग्रसेन भवन ट्रस्टचे अध्यक्ष गिरीश अग्रवाल ,सचिव शैलेंद्र कागलीवाल,महाराजा अग्रसेन भवन ट्रस्टचे अध्यक्ष एड डी. डी. सौ निशा लोहिया, सचिव मीना बाजोरिया आदिनी केले आहे.

## प्राथमिक आरोग्य केंद्र धाबा येथे
# ८० तरुणांनी केले शिबिरात रक्तदान

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी):** बार्शीटाकळी तालुक्यातील ग्राम धाबा येथे प्राथमि क आरोग्य केंद्र धाबा येथे स्वेच्छेने ८० तरुणांनी रक्तदान केले.या शिबीरातील संकलीत रक्तसाठा हा साई जीवन ब्लड बँक येथे देण्यात आला. या रक्तदान शिबीराला राजेश धाबेकर, मनोहर राठोड, सोनु वाटमारे, करन साहू, योगेश टापरे, प्रल्हाद गालट, जुगलकिशोर जामनिक, आतिष राठोड, आशिष धाबेकर, सतीश राठोड, कुलदीप चव्हाण, शुभम नाईक, गौतम तपासे, महेश घणघावं, मयुर काळे, त्रिशरण हातोले व विद्रुपेश्वर मित्र मंडळ आणि शूरवीर सेवालाल महाराज मित्र मंडळ लोहगड यांचे मोलाचे योगदान व समस्त गोर सेना अकोला जिल्हा आदींनी भेटी दिल्या. सदर रक्तदान शिबीराचे आयोजन जनार्धन खिल्लारे, गणेश कुटे, हरीश धाबेकर, अक्षय वाळके, शुभम गालट, लक्ष्मण



वाकोडे, चेतन कोल्हे, मयुर चांभारे, दर्शन थोंबळे, गिरधर राठोड, भुषण राठोड, जीवन जाधव, अक्षय चोंडकर, प्रवीण तेजवात, विशाल गुळदे, विवेक

## गोरव्हा येथील ग्रामसभा उत्साहात

**विझोरा :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत १७ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायत गोरव्हा येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेमध्ये शासन निर्णयाचे वाचन करून दाखवण्यात आले व गाव पातळीवर समिती तसेच गट तयार करण्याबाबत चर्चा करण्यात आली. या ग्रामसभेलाप्रमोद ठोसर मंडळ अधिकारी यांनी भेट दिली. सरपंच त्रिशीला डोंगरे, उपसरपंच महाराणी राठोड, कांता राठोड, सुवर्णा खांबलकर, अतुल खांबलकर ग्रामपंचायत सदस्य, राजेश खांबलकर माजी सरपंच आदि उपस्थित होते.

### निधन वार्ता
### जोत्स्ना पाटील



**अकोला** : अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे जेष्ठ प्रचारक राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समिती अकोला चे कार्यकारी सदस्य तथा वस्त्रयोद्धा कापड दुकानाचे संचालक श्री गंगाधर पाटील याच्या धर्म पत्नी जोत्स्ना पाटील यांचे शनिवारी रात्री ८ वाजता वयाचे ६३ व्या वर्षी दुःखद निधन झाले त्या श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या सक्रिय कार्यकरत्या तसेच अत्यंत मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या त्यांची अंत्ययात्रा उद्या दि २१ सप्टेंबर रविवारी सकाळी १० वाजता त्यांचे राहते घर राऊतवाडी अकोला येथून निघेल अंत विधी उमरी सम शान भूमी येथे झाले. त्यांचे पच्छात पती, दोन मुले एक मुलगी सुना नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे मूर्त आत्म्यास माजी सैनिक सुभाषराव म्हैसने व म्हैसने परिवार डाबकी रोड व पाटील समाज वर वधू सूचक केंद्र अकोला च्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

## सेवा पंधरवाडा निमित्त भारतीय जनता पक्ष
## अकोला महानगरतर्फे भव्य आरोग्य शिबिराचे




**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** या शिबिरामध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या गेल्या तसेच गरजू रुग्णांना मोफत औषधे व आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला.

यावेळी अकोल्यातील सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. सुजित सुनिल फोकमारे यांच्या गणराया ऑर्थोकेअर हॉस्पिटल तर्फे १२०० रुपये खर्च असणारी हाडांची ठिसुळता तपासणी (इचऊ) मोफत करण्यात आली. ह्या शिबिरात डॉ. गोपाल गोंडचर, डॉ. तुषार चरखा, डॉ. दर्शन तातीया, डॉ. प्रशांत काटोले, डॉ. जयंत म्हैसने, डॉ. गौरव शिंदे, डॉ. सुनिल जाधव, डॉ. नरेश गोंड, डॉ. तुषार माळोकार, डॉ. निखिल बक्षी, डॉ. रविंद्र तेलकर, डॉ. जुगलकिशोर चितलांगे, डॉ. जुगल चिराणीया, डॉ. विक्रांत इंगळे आदी डॉक्टर मंडळींनी सेवा देऊन औषधोपचार केले.याप्रसंगी खासदार अनुपजी धोत्रे, माजी महापौर विजयजी अग्रवाल,

महानगर अध्यक्ष जयंतराव मसने, संघटन सरचिटणीस संजयजी गोटफफडे, सरचिटणीस ॲड. देवाशीषजी काकड, सरचिटणीस रमेशजी अलकरी, पवन महल्ले आदि उपस्थित होते.

## सी.सी.टी.एन.एस.कार्यप्रणाली
# अकोला जिल्हा पोलीस महाराष्ट्र राज्यातुन चौथा तर अमरावती परिक्षेत्रातुन द्वितीय कमांकावर

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** पोलीस दलाच्या कामकाजात सुसूत्रता यावी यासाठी सीसीटीएनएस (क्राईम क्रीमीनल ट्रॅकींग नेटवर्क सिस्टम) प्रणाली सुरू केली आहे. यात पोलीस स्टेशन येथील अभिलेखांची ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणी केली जाते. सीसीटीएनएस प्रणालीत देशपातळीवरील गुन्हे व माहीती यामध्ये उपलब्ध होते. त्यामध्ये ई-तकार, अनोळखी मृतदेह शोधने, गुन्हे प्रतिबंध कारवाई, वाहनांची पडताळणी करणे, गुन्हे उघडकीस आणने आदी करीता ही प्रणाली महत्वाची ठरते.सीसीटीएनएस मध्ये पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयांपासून ते तपास व दोषारोपपत्र इत्यादी २१ प्रकारची माहीती अपलोड करावी लागते. सिटीझन पोर्टलवर एफ.आय.आर. पब्लीश करणे व प्रत्येक महिन्याला प्राप्त होणा-या ई तक्रारीचे ८० टक्केचे वर निराकरण करुन निर्गती करणे आणि इतर पोलीस स्टेशन कडुन प्राप्त झीरो एफ.आय.आर. विहीत वेळेत दाखल करणे व प्रतिबंधक कार्यवाही, बेल रीजेक्ट संबंधाने, पोलीस व्हेरीफीकेशन संबंधाने, सीसीटीएनएस प्रणालीचा उपयोग घेवुन गुन्हे उघडकीस आणल्या बाबत सक्सेस स्टोरीची माहिती घटकाकडुन वरीष्ठ कार्यालय, पुणे यांना सादर करण्यात येते. तसेच सीसीटीएनएस संबंधीत देश पातळीवर कार्यान्वीत असलेले क्राईम मॅक पोर्टल व इटसो पोर्टल बाबत सुध्दा माहिती सादर करण्यात येते. नमुद माहिती संपुर्ण महाराष्ट्रातील घटकाकडुन वरीष्ठ कार्यालय, पुणे येथे सादर करण्यात येते. या सर्व बाबी तपासुन वरीष्ठ कार्यालया कडुन गुण देण्यात येवुन रॅकींग जाहिर करण्यात येते.गुन्हे अन्वेषण विभागाचे अपर पो. महासंचालक यांनी माहे जुन २०२५ महीण्याचा अहवाल जाहीर केला असता त्यामध्ये एकुण ५३ घटकापैकी अकोला पोलीस दलाने २०१ गुणां पैकी १९८ गुण ( ९८.५१ % ) प्राप्त करून राज्यात चौथा क्रमांक तसेच अमरावती परीक्षेत्र, अमरावती विभागातुन द्वितीय क्रमांक पटकावून अकोला जिल्हा पोलीस दलाची मान उंचावली आहे.मा. पोलीस अधीक्षक, अर्चित चांडक, नोडल अधीकारी तथा अपर पो. अधीक्षक बी. चंद्रकांत रेडडी, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांचे मार्गदर्शनाखाली पोहेकॉ सतिश भातखडे, पोहेकॉ निखिल सावळे, पोकॉ शुभम सुरवाडे व मपोका सोनाली राठोड यांनी यासाठी परीश्रम घेतले तसेच पोलीस स्टेशन व उपविभागीय स्तरावरील सीसीटीएनएस अंमलदारांचेही यामध्ये महत्वाचे योगदान आहे.

### अनय तायडे ॲरोबिक्स मध्ये देशात दुसरा

**अकोला** : सीबीएसई राष्ट्रीय ॲरोबिक्स स्पर्धेत प्रभात किड्स स्कूलचा अनय तायडे ह्याने शिर्डी येथे झालेल्या स्पर्धेत आपल्या खेळाची चमक दाखवून सिल्वर पदकाचा मानकरी ठरला.


**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI**

No. SGBAU/8/C-1963 **WANTED** Date: 18-09-2025

**Name of the College - Smt. Padmabai Jain Mahavidhyalaya Aalegaon, Dist.- Akola. (Minority Status)**

Applications are invited for Full Time Regular Posts as per following details in the faculty of Science & Technology/Humanities/ Commerce & Management/ Interdisciplinary Studies.

Vacancies for Non-Grant Courses/Programmes

| S N | Name of the Post | Subject/ Course | Category wise No. of Post | | | | | | | Total No. of Post |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Open | SC | ST | OBC | SBC | VJNT | Any Others | |
| 1 | Principal | B.A. B.Com B.Sc. | 01 | - | - | - | - | - | - | 01 |

For qualifications/Experience/Pay Scale and other details/conditions visit university website www.sgbau.ac.in and College E-mail: spj2022@gmail.com, **Mo. 9890119567, 8208767035**
fn-new advertise format-216 **Interview Date 1/10/2025**

**- PRINCIPAL**


## तेल्हारा खरेदी विक्री संस्थेची वार्षिक सर्वसाधारण आमसभा संपन्न




**▪तेल्हारा,दि २१ (प्रतिनिधी) :** तेल्हारा तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्था मर्यादित तेल्हाराची सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील वार्षिक साधारण सभा गुरुवार दिनांक १८ सब्टेबर रोजी भागवत मंगल कार्यालयात संस्थेचे उपाध्यक्ष राजेश्वर टोहरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सभेला प्रमुख उपस्थिती म्हणून सहकार नेते कृषी उत्पन्न बाजार समिती चे संदीप पाटील खारोडे, पुंडलीकराव अरबट, शांताराम काळे ,सुभाष खाडे तेल्हारा कृषी ऊपन्न बाजार समिती उपसभापती हरिदास वाघ कॉग्रेस चे तालुकाध्यक्ष गजानन वानखडे, भाजपाचे तालुकाध्यक्ष गणेश रोठे जिनीग प्रेसीगचे अध्यक्ष शेषराव पाथ्रीकर तेल्हारा नगरपरिषद माजी उपाध्यक्ष राजेश खारोडे निळकंठराव बचे संस्थेचे संचालक संस्थेचे अध्यक्ष सुरेश ढोले चंद्रकांत ताथोड, अनंतराव अहेरकर, शिवहरी काळे, पंढरीनाथ कोरडे, सौ वैशाली सदानंद खारोडे अरुण तेल्हारकर,शरद आखरे, पंकज आढे , पुंडलीकराव खारोडे, विठ्ठलराव खारोडे, किसनराव बोडखे,रमेश दारोकार ,सौ राधेश्याम भदे,सौ अनितातार्इ पुंडलीकराव अरबट,सौ रत्नप्रभाताई गुणवंतराव खारोडे, नितीन वानखडे, योगेश कुकडे यांची उपस्थिती होती संत गजानन महाराजांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करुन दिपप्रज्वलन व हारार्पन केले यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष राजेश्वर टोहरे यांनी अहवाल वाचन करून संस्थेच्या प्रगतीचा लेखाजोखा उपस्थित भागधारकांसमोर मांडला यावेळी संस्थेच्या ठरावाला मंजुरी देण्यात आली संस्थेच्या २०२४-२५ अखेरच्या वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक, नफा तोटा पत्रक भागधारकांसमोर मंजुरी साठी सादर केला संस्थेच्या अहवाल वर्षात व्यापारी नफा रु ८७३६८ झाला असून अहवाल वर्षात मध्ये ९४५९९७ तोटा असुन संचित नफा रु १४३००४५ एवढा आहे.

संस्थेकडे कोणत्याही प्रकारचे कर्ज नाही संस्थेची आर्थिक परिस्थिती चांगली असुन संस्थेने ३६ लाख रुपयांची मुदत ठेव पावती काढुन ठेवलेली आहे त्यावर दरवर्षी व्याज मिळत असुन पावती ची रक्कम दरवर्षी वाढत आहे.

## आपले सरकार केंद्रे होणार आदर्श!

अकोला : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते महात्मा गांधी यांची जयंती या पंधरा दिवसांच्या कालावधीत जिल्ह्यात सेवा पंधरवडा हे अभियान राबविले जाणार आहे. यामध्ये नागरिकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबरोबरच शासकीय सेवांचेअद्ययावतीकरण केले जाणार आहे.

यामध्ये तलाठी कार्यालये आता गूगल मॅपवर येणार आहेत, तर आपले सरकार केंद्रांना आदर्श केंद्रे केले जाणार आहे. सेवा पंधरवड्याच्या कालावधीत पांदण रस्त्यांचा कायापालट होणार आहे. त्यांची नोंद म हसूल नकाशावर झाल्याने आता त्यावर कोणतेही अतिक्रमण होऊ शकणार नाही. सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत शासकीय जमिनींवरील अतिक्रमणधारकांना जागेचे पट्टे वाटप करण्यात येईल.


**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI**

No. SGBAU/8/C-2154/2025 **WANTED** Date: 19-09-2025

**Name of the College - Swa. Ujawalbapu Deshmukh College, Nivana,Tq. Sangrampur, Dist. Buldana. (Minority Status)**

Applications are invited for Full Time Regular Posts as per following details in the faculty of Science & Technology/Humanities/ Commerce & Management/ Interdisciplinary Studies.

Vacancies for Non-Grant Courses/Programmes

| S N | Name of the Post | Subject/ Course | Category wise No. of Post | Total No. of Post |
|---|---|---|---|---|
| 1 | Principal | -- | 01-Open | 01 |

For qualifications/Experience/Pay Scale and other details/conditions visit university website www.sgbau.ac.in and College Mail Id ujwalbapudeshmukhcollege@gmail.com
Mob. 9423721654, 8208767035
**Interview Date 30/09/2025**

**- PRINCIPAL/SECRETARY**


RNINO-46973/1986 **महासागर अकोला** मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्री**कृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

